# महाराष्ट्र शासन

(323)

क्र. जमीन-२६१३/प्र.क्र. ६३/ ज-३.

महसूल व वन विभाग,
जागतिक व्यापार केंद्र, सेंटर-१ इमारत,
३२ वा मजला, कफ परेड,
मुंबई-४००००५.
दिनांक: 99 सप्टेंबर, २०१४.

D.

**विषय :- जमिन - मुंबई उपनगर जिल्हा**
**मौ. मोहिली ता. कुर्ला, न.भू.क्र. ६८५ अ मधील क्षेत्र ४९५.७० चौ. मी. या शासकीय मिळकतीबाबत.**
**रुणवाल रियालिटी प्रा. लि. यांची विनंती.**

**ज्ञापन** :- जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना त्यांचे पत्र क्र. सी / कार्या- ३ डी / कावि- ३८१/ २०१२, जा.क्र. २१२, दिनांक ८.१.२०१३ व विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना त्यांचे पत्र क्र. मशा/ कार्या-२/ जमीन-३/ कावि-३७४/ १२/ सिआर ०२/ १३, दिनांक २८.२.२०१३ तसेच मेहरा इंडस्ट्रियल कॉर्पोरेशन यांचे भागीदार व कुलमुखत्यारपत्र धारक यांनी शासनास सादर केलेले दिनांक १६.७.२०१४ रोजीचे पत्र आणि रुणवाल रियालिटी प्रा.लि. यांनी शासनास सादर केलेले दिनांक १८.७.२०१४ रोजीच्या पत्राला अनुलक्षून असे कळविण्यात येते की, मौजे मोहाली येथील न.भू.क्र. ६८५ अ मधील ४९५.७० चौ.मी. शासकीय जमीन महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे ) नियम, १९७१ मधील नियम क्र. ३७ मधील तरतुदीनुसार त्या जमिनीची प्रचलित बाजारमूल्याची किंमत ( Current Market Rate ) आकारुन, सदर जमीन रुणवाल रियल्टी प्रा.लि. यांना खालील अटी व शर्तीवर प्रदान करण्यास याद्वारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे:

**अटी व शर्ती** :-

(१) संदर्भित जमीन भोगवटादार वर्ग-२ म्हणून राहील.
(२) जमिनीचा विकास बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पूर्व मंजुरीने मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील तरतुदीनुसार करणे आवश्यक राहील.
(३) न.भू.क्र. ६८५ अ च्या लगत ६८५ बी चे क्षेत्रावरील डि.एस.के. सोसायटीच्या व इतर रहिवाशांना ये-जा करण्यासाठी रस्ता उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी रुणवाल रियाल्टी प्रा. लि. यांची राहील.
(४) प्रश्नांकित जमिनीवरील अतिक्रमण निष्कासनाची जबाबदारी संबंधितांची राहील.
(५) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना उचित वाटतील अशा इतर अटी व शर्ती.

२. हे ज्ञापन वित्त विभागाच्या सहमतीने (अनौ.संदर्भ क्र. ४३५/२०१४/व्यय-०९, दिनांक ६.८.२०१४ अन्वये) मंजूर करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सही)
**( अ.ज्ञा.होमकर )**
**शासनाचे अवर सचिव**

16 SEP 2014
18655

**प्रति**
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा,
प्रशासकीय इमारत, १० वा मजला,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

कार्यासन २-ड कडे प्रकरण पाठवण्यात याने.

श्री केदार

Scanned by CamScanner

प्रतिलिपी -

१) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.

२) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका. मुंबई-४०० ००१.

३) जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, मुंबई उपनगर जिल्हा, प्रशासकीय इमारत, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

४) संचालक, रुणवाल रियालिटी प्रा. लि. रुणवाल अँण्ड ओमकार ईस्क्वेअर, ५ वा मजला, सायन (पूर्व), मुंबई-४०० ०२२.

५) प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-१/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.

६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.

७) निवड नस्ती, ज-३ कार्यासन, महसूल व वन विभाग, ३२ वा मजला, सॅटर १ इमारत, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई-४०० ००५.

----

Scanned by CamScanner

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा

क्रमांक :सी/कार्या-२ डी /एफ-३०६
दिनांक :२९/१०/२०१४

**वाचावे:** १) या कार्यालयाचे पत्र क्र. सी/कार्या-३डी/कावि-३८१/२०१२ दि. ०८/०१/२०१३
२) शासन, महसूल व वन विभागाचे ज्ञापन क्र. जमीन-२६१३/प्र.क्र.६३/ज-३
दि. ११/०९/२०१४

**आदेश:-**

[illegible] मोहिली तालुका कुर्ला येथील न.भू.क्र. ६८५ अ मधील ४९५.७० चौ.मी. क्षेत्र महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) अधिनियम १९७१ मधील नियम क्र. ३७ मधील तरतुदीनुसार जमिनीची प्रचलित बाजार मुल्याशी किमत (Current Market Rate) आकारून सदर जमीन रूणवाल रियालिटी प्रा. लिमिटेड यांना कब्जेहक्काने प्रदान करण्यास उपोद्घातातील क्र. १ कडील ज्ञापनाने शासनाने मान्यता दिलेली आहे.

उक्त ज्ञापनान्वये दिलेल्या निर्देशाप्रमाणे सन २०१४ चे शिघ्रसिध्द गणकानुसार होणारी जमिनीची बाजार मूल्याची किमत रू. १,८१,९२,१९०/- (एक कोटी एक्याऐंशी लाख ब्याण्णव हजार एकशे नव्वद मात्र) मे. रूणवाल रियालिटी प्रा.लि. यांनी दिनांक १४/१०/२०१४ पत्राने एच डी एफ सी बँकेचो पेऑर्डर क्र. ०५९७१६ दिनांक १३/१०/२०१४ अन्वये शासन जमा केलेली आहे. यास्तव मे. रूणवाल रियालिटी प्रा.लि. यांना जमीन प्रदानाबाबत खालील अटीशर्तीवर मंजूरी देण्यात येत आहे.

**अटी/शर्ती :-**

१) प्रश्नांकित जमीन भोगवटादार वर्ग-२ म्हणून राहील.

२) प्रश्नांकित जमिनीचा विकास बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पूर्व मंजुरीने मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील तरतुदीनुसार करणे आवश्यक राहील.

३) न.भू.क्र. ६८५ अ च्या लगत ६८५ बी चे क्षेत्रावरील डि. एस.के. सोसायटीच्या व इतर रहिवाशांना ये-जा करण्यासाठी रस्ता उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबंधितांची राहील.

४) प्रश्नांकित जमिनीवरील अतिक्रमण निष्कासनाची जबाबदारी संबंधितांची राहील.

५) अर्जदार यांना प्रस्तावित भूखंड किंवा त्यातील निवासी/वाणिज्यिक बांधकाम शासनाच्या पूर्व मान्यतेशिवाय तारण किंवा गहाण ठेवता येणार नाहीत. यासाठी शासनाने ठरविलेले तारण शुल्क अदाकरून पूर्व मंजूरी घेणे बंधनकारक राहील.



Scanned by CamScanner

६) जमीनीचा वापर वाणिज्य प्रयोजनार्थ करणार असल्यास गाळा धारकाला गाळयाचे हस्तांतरण करावयाचे झाल्यास या कार्यालयाची परवानगी घ्यावी लागेल. तसेच शासन निर्णय दि. २३/११/२००१ दि.२४/०८/२००४ व दि. ०७/०९/२००७ मधील तरतूदीनुसार अनुज्ञाप्ती शुल्क/हस्तांतरण शुल्क शासनास अदा करणे बंधनकारक राहील.

७) जागेवरील इमारतीचे बांधकाम चालू करणेपूर्वी अकृषिक परवानगी घेणे बंधनकारक राहील. तसेच वापरात बदलासंबंधी रूपांतरीत कर भरावा लागेल.

८) जमीनीचे विकासना दरम्यान खाणी, खनिज पदार्थ, दगड/ माती इत्यादीवर शासनाचा अधिकार राखून ठेवलेला असून महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील तरतूदीप्रमाणे गौण खनिजाचे उत्खनन करणेपूर्वी या कार्यालयाची परवानगी घ्यावी लागेल.

९) या जमीनीचा विकास करण्याच्या कामी जमिनीचे पोटविभाजन करावयाचे झाल्यास त्याकरीता या कार्यालयाची रितसर परवानगी घ्यावी लागेल.

१०) करारनाम्यातील अटी व्यतिरिक्त शासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणा-या निर्देशानुसार अन्य अतिरीक्त अटी/ शर्तीचा समावेश करण्याची या कार्यालयास मुभा राहील.

११) शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्यास सदर जागेवर शासनाच्या कामानिमित्त प्रवेश करण्यास मुभा असेल.

१२) प्रश्नाधीन जमीन ही मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत असल्याने रस्ता/ रुंदीकरण किंवा अन्य प्रयोजनासाठी विकास आराखडयांत आरक्षणाप्रमाणे बाधित होणारे क्षेत्र हे या कार्यालयाचे पूर्व परवानगी घेऊन मुंबई महानगरपालिका यांचेकडे हस्तांतरीत करणे बंधनकारक राहील.

१३) जमीनीचा विकास विकासकामार्फत करणार असल्यास सदर विकास करारनाम्यास या कार्यालयाची मान्यता घेण्यात यावी. सदर करारनामा व सदनिका/गाळे खरेदी करणार यांचे करारामध्ये शासन ज्ञापन/इकडील आदेशामधील अटी/ शर्ती व शासन निर्णय दि. २५/०५/२००७ मधील तरतूदींचा योग्य तो समावेश करण्यात यावा. सदरचा करारनामा शासन धोरणाशी विसंगत नसावा.

१४) प्रश्नांकित मिळकतीच्या आरक्षणात भविष्यात बदल झाल्यास सदर क्षेत्राचा विकास करणेकामी शासन/या कार्यालयाची व महानगरपालिका यांची परवानगी घेणे बंधनकारक राहील.

१५) वरील पैकी कोणत्याही अटी/ शर्तीचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास भूखंड प्रदान करण्याबाबतचे आदेश रद्द करण्यांत येईल तथा प्रश्नांकित मिळकतीवरील विकास काम/ इमारतीचे बांधकाम थांबविण्याचे अधिकार या कार्यालयास राहतील.

१६) त्याचप्रमाणे या अटी/शर्ती बांधीलकीबाबत ३० दिवसात या कार्यालयासमवेत करारनामा करणे बंधनकारक राहील.

सही/-
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा



Scanned by CamScanner

प्रति,

संचालक, रूणवाल रियालिटी प्रा.लि.मि,

रूणवाल ॲन्ड ओमकार ईस्क्वेअर, ५ वा माळा

सायन चुनाभट्टी सिग्नल समोर, सायन (पुर्व), मुंबई ४०० ०२२.

345

प्रत-

१) नगर भूमापन अधिकारी, कुर्ला यांस माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

२/- प्रकरणी मंजूर जमीनीचा ताबा मंडळ अधिकारी यांचे समवेत प्रतिग्रहितास देऊन त्या बाबतची ताबेपावती व अधिकार अभिलेखात दुरूस्ती करून सुधारीत अभिलेखाच्या प्रतीसह अहवाल सादर करावा.

२) तहसिलदार कुर्ला यांस माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

२/- प्रतिग्रहितांस जमीनीचा ताबा देणेची कार्यवाही नगर भुमापन अधिकारी कुर्ला यांचे समवेत संयुक्तिकरित्या पूर्ण करून ताबे अंती अधिकारी अभिलेखात दुरूस्ती करून पुर्तता अहवाल सादर करावा.

३) प्रत मा. अपर मुख्य सचिव (महसूल व वन विभाग) यांना माहितीसाठी सविनय सादर.

४) मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.

स्थळप्रतीवर मा.जिल्हाधिकारी यांची सही असे

जिल्हाधिकारी,

मुंबई उपनगर जिल्हाकरिता

Scanned by CamScanner

(३७१)

मोहिली/मुंबई
दिनांक - ०२/१२/२०१४

# ताबा पावती

मा.जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, वांद्रा, मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक - सी/कार्या-२डी/एफ्-३०६ दिनांक - २१/१०/२०१४ अन्वये मौजे-मोहिली, तालुका - कुर्ला, जिल्हा- मुंबई उपनगर येथील न.भू.क्र.६८५अ मधील ४९५.७० चौ.मी. या जागेचा ताबा देणेकामी मंडल अधिकारी कुर्ला/मोहिली श्री.एस्. डी. मोरे व नगर भूमापन अधिकारी कुर्ला यांचे वतीने परिरक्षण भूमापक श्री. पी. व्ही. भिसे हे आज दिनांक - ०२/१२/२०१४ रोजी सकाळी ११.३० वा. प्रत्यक्ष जागेवर येवून स्थानिक पंचाच्या समक्ष सदर जमिनीचा ताबा रुणवाल रियालिटी प्रा.लि. यांना दिला. जमिनीचा ताबा दिल्याची पावती लिहून दिली.

ठिकाण :- मोहिली/कुर्ला - मुंबई
दिनांक :- ०२/१२/२०१४

ताबा घेणार :-

SANTOSH TIWARI
DIRECTOR COMML.
RUNWAL GROUP.

ताबा देणार :-

१)
(श्री.एस्.डी.मोरे)
मंडल अधिकारी कुर्ला/मोहिली

२)
(श्री.पी.व्ही.भिसे)
परिनिरिक्षण भूमापक कुर्ला

सरकारी कामाकरिता।
2/12/13
नगर भूमापन अधिकारी
कुर्ला

Scanned by CamScanner